# प्रकरण : १ ले

## मराठी सामाजिक कादंबरीचा आढावा

कादंबरीची संकल्पना

कादंबरीचे प्रकार

सामाजिक कादंबरी

१८५७ ते १८८५ मधील सामाजिक कादंबरी

१८८५ ते १९२० मधील सामाजिक कादंबरी

१९२० ते १९६० मधील सामाजिक कादंबरी

१९६० ते २००६ मधील सामाजिक कादंबरी

स्त्री-लेखिका व सामाजिक कादंबरी

समारोप

## प्रकरण १ ले

## मराठी सामाजिक कादंबरीचा आढावा

एकोणिसाव्या शतकात स्त्रियांनी विविध प्रकारची साहित्यनिर्मिती केली आहे. कथा, कादंबरी, कविता इ. ललित साहित्याप्रमाणे निबंध, लेख अशा प्रकारचे वैचारिक लेखनही स्त्रियांनी केले आहे.

समाज हा नेहमी बदलत असतो. आजची सामाजिक परिस्थिती आणि एकूणच सांस्कृतिक वातावरण बदलते आहे. शिक्षण तळागाळातल्या माणसापर्यंत पोहचू लागले आहे. त्याचा आविष्कार ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जीवनवादी, आदिवासी इ. अनेक साहित्य प्रवाहाच्या रूपाने प्रकट होत आहे. समाजाचा महत्त्वाचा घटक असलेली स्त्री, तिच्या वेदना, दु:ख, कुटुंबातील तिचे स्थान इ. विविध प्रश्न स्त्रीवादी साहित्याच्या रुपाने व्यक्त होऊ लागलेले दिसतात. विभावरी शिरूरकर, गौरी देशपांडे, ज्योत्स्ना देवधर, शांता गोखले, कविता महाजन इ.लेखिकांनी सामाजिक जाणिवेतून लेखन केलेले आहे. नीलम माणगावे यांच्या 'शोध' व 'मृत्यूदंड' या सामाजिक कादंबऱ्यांच्या अभ्यासाआधी मराठी साहित्यातील सामाजिक कादंबऱ्यांचा आढावा घेणे योग्य ठरेल.

**कादंबरीची संकल्पना**

संस्कृत कवी बाणभट्ट यांनी 'कादंबरी' नावाची गद्यकथा लिहिली. त्यातील नायिकेचे नाव 'कादंबरी' होते. तेच नाव सर्वज्ञात होऊन ते नाव सर्वांनी स्वीकारले. इंग्रजीतील नॉव्हेल या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून मराठीत 'कादंबरी' हा शब्द रुढ झाला.

मराठी विश्वकोशातील व्याख्या

''कादंबरी म्हणजे एक दीर्घ गद्य साहित्य प्रकार.'' [१]

**रा. ग. जाधव यांची व्याख्या**

'कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व त्यांना अनुरुप अशी निवेदने, तंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.'

श्री. मा. कुलकर्णी यांची व्याख्या

''कादंबरी हा अनिर्बंध व शिथिल असा प्रकार असल्यामुळे अमूक एक लिखाण कादंबरी आहे की नाही हे ठरविणे कठिण जाते.''[२]

**कादंबरीचे प्रकार**

लेखकांनी आपले जीवनानुभव आपल्या प्रवृत्तीनुसार, प्रकृतीनुसार निवड करुन मांडणी केली व त्याचे रूप आपल्या कादंबरीत आखले. त्यावरुन कादंबरीचे विविध प्रकार पडले. ऐतिहासिक, पौराणिक, अद्‌भुतरम्य, संज्ञाप्रवाही, चरित्रपर, समस्याप्रधान, ग्रामीण, दलित, प्रादेशिक, सामाजिक इ. कादंबरीचे प्रकार दिसून येतात.

**सामाजिक कादंबरी**

समाज हा व्यक्तिंनी मिळून बनलेला असतो. व्यक्तिंशिवाय समाज नाही व समाजाशिवाय व्यक्ती नसते. समाज हा शब्द धर्म, प्रदेश, जाती, लोकांचा समुच्चय, स्त्रियांचे संघटन, संस्था अशा वेगवेगळ्या अर्थांनी वापरला जातो. प्राण्यांच्या समुच्चयास कळप वा झुंड असे म्हणतात तर मानवाच्या समाजाला सामाजिक, सांस्कृतिक समाज म्हणतात.

लेखक हा समाजातीलच एक घटक असतो. याच समाजात वावरत असताना येणारे जीवनानुभव तो आपल्या कादंबरीतून व्यक्त करीत असतो. ज्या काळात तो लिहितो त्या काळाचे, स्थळाचे चित्रण त्याच्या कादंबरीत येत असते. तसेच लेखक जेव्हा एखादी साहित्यकृती निर्माण करतो तेव्हा ती अनेक व्यक्तिंच्या हिताहितांशी आणि आचार-विचारांशी संबंधित असते म्हणून त्या साहित्यकृतींना सामाजिक संदर्भ असतो. 'सभोवतालच्या समाजाचे सूक्ष्म अवलोकन करून त्यातील वर्तमान व भावी अन्त:प्रवाहाची दिशा व्यक्त करून समाजाचे चित्र रंगविणे हे सामाजिक कादंबरीकाराचे साध्य असते.'

लेखक ज्या सामाजिक वातावरणात, परिस्थितीत वाढतो त्यातून त्याच्यावर संस्कार होतात व त्याचे व्यक्तिमत्त्व घडत असते. त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन असतो. मनात सामाजिक जाणीव निर्माण होत असते. ह्याचा परिणाम त्याच्या लेखनावर होत असतो. सामाजिक जाणीव व्यक्त करण्यास कादंबरी हा वाङ्मय प्रकार पूरक आहे. लेखक समाजातील चालीरीती, रुढी, परंपरा, नीतिनियमांच्या चौकटीचा व्यापक अर्थाने विचार करतो, शोध घेतो. मानवी जीवनातील अनेक प्रश्नांचा खोलवर विचार करतो व आपल्या कादंबरीतून व्यक्त करतो. त्यातूनच सामाजिक कादंबरी जन्मते. ''समाजातील एखादी प्रचलित रूढी, एखाद्या कुटुंबातील धार्मिक परंपरा अशा परंपरेशी निगडीत असणारा समाज, त्या समाजात निर्माण होणारा एखादा सामाजिक प्रश्न आणि त्या प्रश्नातून निर्माण झालेले दु:ख जेव्हा कादंबरीकार शब्दबद्ध करतो तेव्हा ती कादंबरी सामाजिकतेचे परिमाण घेऊनच जन्मते.''[३] समाजातील प्रश्न, दु:ख मांडत असताना कलात्मकता सांभाळावी लागते. सामाजिक कादंबरीचे वर्तमानकाळात ज्या घटना, घडामोडी घडत असतात त्याचे चित्रण, वाङ्मयीन मूल्ये सांभाळून केलेले असते. ''सामाजिक कादंबरी हा कलेच्या पातळीवर वर्तमान वास्तवाचा शोध असतो, आकलनाचा प्रयत्न असतो.''[४]

सामाजिक कादंबरीत वर्तमानकाळातील घटना, घडामोडी किंवा भविष्यकालीन समाजाचे चित्रण केलेले असते. ''सामाजिक कादंबरी भोवतालच्या सृष्टीचे व सद्यकालीन आणि क्वचित प्रसंगी भावी समाजाचे चित्र रंगवितात.''[५] सामाजिक कादंबरीचे विशिष्ट सामाजिक वातावरणनिर्मिती, माणसा-माणसातील परस्परसंबंध, व्यवहाराचे चित्रण केलेले असते. जसजसा समाज बदलतो तसतसे सामाजिक संदर्भ बदलत असतात. ''सामाजिक कादंबरीचे वैशिष्ट्य हे असते की, ती परिवर्तनातील गतिशीलतेवर लक्षकेंद्रित करते. त्यामुळे काळानुसार, परिस्थितीतील बदलानुसार मानवी संबंधामध्ये कसा फरक पडत जातो याचे चित्रण ती करते. त्यामुळेच सामाजिक कादंबरी सतत गतिमान असलेल्या काळाचे भान देते. काळानुसार बदलत जाणाऱ्या सांस्कृतिक आणि आर्थिक परिवर्तनाचे मानवी वर्तनावर कसकसे परिणाम होतात याचे चित्रण सामाजिक कादंबरीत करते. त्यामुळे सामाजिक कादंबरीतून

समाजाच्या स्वभावाचे विश्लेषणही होत असते. समाजाची स्थितीगती, परिवर्तन आणि मूल्यव्यवस्था यावरती लक्षकेंद्रित करते. त्यातूनच निर्माण होणाऱ्या नैतिक प्रश्नांचा ऊहापोहही ती करते.''[६] सामाजिक कादंबरीचाच एक भाग म्हणून प्रचारकी कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. कारण त्यांचे स्वरूप बऱ्याच वेळा बोधवादी किंवा नीतिकथाचे आहेत.

व्यक्ती, व्यक्तिंची कुटुंब, कुटुंबाचा समाज बनलेला असतो. व्यक्तिंची सुख दुःखे, त्यांच्यातील भावसंबंध, हेवेदावे, संघर्ष, समाजाचे वेगळेपण, जीवनपद्धती इत्यादींचे चित्रण सामाजिक कादंबरीत येताना दिसते. काळानुसार समाज बदलतो तस तसा सामाजिक कादंबरीतील आशय बदलताना दिसतो.

**१८५७ ते १८८५ :**

१८५७ मध्ये बाबा पद्मनजी यांनी 'यमुना पर्यटन' ही पहिली स्वतंत्र सामाजिक कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीत विधवांच्या शोचनीय अवस्थेचे वर्णन केले आहे. पद्मनजी यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारलेला होता. त्यामुळे कादंबरीत ठिकठिकाणी येशूची महती गायिलेली असून शेवटी नायिका ख्रिस्ती बनते, पुनर्विवाह करते असे चित्रण आहे. १८७९ मध्ये म.वि. रहाळकरांनी 'नारायणराव व गोदावरी'ही सामाजिक कादंबरी प्रसिद्ध केली. महाराष्ट्रातील मध्यमवर्गाचे वास्तवदर्शी चित्रण या कादंबरीत आहे. विनायकराव ओक यांच्या 'शिरस्तेदार' या छोट्या व स्वतंत्र कादंबरीमध्ये लाच खाण्यापासून होणाऱ्या वाईट परिणामांचे वर्णन आले आहे. 'यशवंतराव आत्मचरित्र', 'वेणू', 'रंगराव' या तत्कालीन इतर वस्तुस्थितीनिदर्शक कादंबऱ्या आहेत. याच काळात फ्रेंच व इंग्रजी भाषेतील सामाजिक कादंबऱ्याची भाषांतरेही झाली आहेत. उदा. 'वाईकर भटजी,' 'नाहीच ना ऐकायचं?' इ. रा.वि.टिकेकर ऊर्फ धनुर्धारी यांच्या 'वाईकर भटजी' या कादंबरीत मध्यमवर्गीय ब्राम्हण कुटुंब आणि त्यांच्या संसारातील सुख दुःखे याचे अस्सल मराठी वळणाचे चित्रण केलेले आहे.

१८५७ ते १८८७ पर्यंतची सामाजिक कादंबरी बोधवादी होती असे दिसते. ''काही थोडे अपवाद वगळता या कालखंडातील अद्भूत, ऐतिहासिक वा सामाजिक कादंबरी या ना

त्या रीतीने बोधपरच होती... कादंबरीतून एक वास्तवचित्र गोचर करावे अशा जाणिवेचा जन्म या कालखंडात झालेला दिसतो... म्हणजे एका अर्थाने या कालखंडाने मराठी कादंबरीच्या जडणघडणीत थोडा हातभार लावला.''[७] या कालखंडात कादंबरीच्या अंगोपांगाची स्पष्ट जाणीव नव्हती. नवनिर्मिती करण्याची हौस होती. सद्यपरिस्थितीतील घडामोडी कधी स्पष्टपणे, कधी आडपडद्याने व्यक्त करण्याचा प्रयत्न मराठी लेखकांनी केलेला दिसतो. अद्भुताची व वास्तवाची थोडीफार जाणीव या काळातील मराठी लेखकांना झालेली दिसते.

**१८२५ ते १९२० :**

'हरिभाऊ कालखंड' म्हणून हा कालखंड ओळखला जातो. हरिभाऊंची पहिली कादंबरी 'मधली स्थिती' (१८८५) 'पुणे वैभवा'मधून क्रमशः प्रसिद्ध झाली. या कादंबरीने अद्भुतरम्य कादंबऱ्याचा प्रवाह मागे टाकून वास्तवतेचे दर्शन घडविण्याऱ्या स्वतंत्र सामाजिक कादंबरीचा प्रवाह सुरू केला. हरिभाऊनी दहा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'मधली स्थिती', 'गणपतराव', 'पण लक्षात कोण घेतो','यशवंतराव खरे', 'मी', 'जग हे असे आहे.' 'भयंकर दिव्य', 'मायेचा बाजार', 'कर्मयोग', 'आजच' या त्या दहा सामाजिक कादंबऱ्या आहेत.

हरिभाऊंनी कादंबरीतील कथानक, व्यक्तिदर्शन यामधून सामाजिक सुधारणावादी दृष्टिकोन मांडला. त्या काळात समाजात बालविवाह, स्त्री-शिक्षण, बालजरठ विवाह, विधवा विवाह, पुनर्विवाह इ. प्रश्न होते. या सर्व प्रश्नांचे चित्रण हरिभाऊंनी आपल्या कादंबऱ्यातून केले आहे. तत्कालीन पांढरपेशा मध्यमवर्गीय जीवनाच्या सुख-दुःखांशी त्यांची कादंबरी अधिक समरस झाल्याने त्यांना 'आजकालच्या गोष्टी' असे संबोधले आहे. त्यांच्या कादंबरीतून स्त्री जीवनाच्या परिस्थितीचे वास्तववादी चित्रण आढळते. इग्रजांच्या विचारांनी, जीवनपद्धतीने प्रभावित झालेल्या तरूणांच्या भावविश्वाचे चित्रण त्यांनी केले आहे. ''आपल्या डोळ्यांपुढे एक अमूर्त समाज जणू समूर्त बनतो, साक्षात होतो. तो मध्यमवर्गीय पांढरपेशा समाज असेल, तो सदाशिवपेठी असेल पण तो साक्षात बनतो. आपले मन आपल्याला सांगत असते, ही खरी 'सामाजिक कादंबरी.''[८] हरिभाऊंनी व्यक्ती व कुटुंब

यांच्यातील ताणतणाव उत्तमरित्या चित्रित केले आहेत. व्यक्तिंची मिळून कुटुंब बनलेली असतात आणि कुटुंबाचा बनलेला समाज आणि या समाजाचे, कुटुंबाचे चित्रण हरिभाऊंनी आपल्या सामाजिक कादंबऱ्यांतून केलेले आहे.

हरिभाऊंची भाषाशैली अत्यंत साधी, सुबोध, प्रवाही बालबोध व पारदर्शक अशी आहे. त्यांची भाषा वाक्यप्रचारांनी, म्हणींनी भरलेली आहे. हरिभाऊंनी नवीन शब्दही तयार केले आहेत. घरगुती भाषेचा वापर अधिक चांगल्यारीतीने केलेला आहे.

याच काळात इतरही कादंबरीकार सामाजिक कादंबऱ्या लिहिताना दिसतात. सहकारी कृष्ण यांनी सामाजिक व कौटुंबिक विषयावर अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'हा संसार की नरकवास?', 'शिकली पण चीज केले' इ., बा.सं. गडकरी ('सुधारणेचा मध्यकाल', 'विद्वान सोबती की कुशल गृहिणी') सी.के.दामले- ('न्याय की अन्याय', जग हे असे आहे), ग.वि. कुलकर्णी ('कर्मसंन्यास', 'जन्मठेप') इ. यांनी अनेक सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ना. ह. आपटे यांनी 'वैभवाच्या कोंदणात', 'भाग्यश्री', 'याला कारण शिक्षण', 'सुखाचा मूलमंत्र' इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. याच कालखंडात 'भारत गौरव ग्रंथमाला', 'सुरस ग्रंथमाला', 'सरस वाङ्मय रत्नमाला', 'महाराष्ट्र कुटुंबमाला','अभिजात वाङ्मय विकासमाला' या कादंबरीमालांनी सामाजिक कादंबरीच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले आहे. नाथमाधव ('विहगवृंद', 'ग्रहदशेचा फेरा', 'विमलेची ग्रहदशा') प्रभाकर भसे ('समाजकंटक अथवा वेणू', 'कर्मफळ'), वा.गो. आपटे ('नवयुग'), वि.वा. हडप ('भविष्यकाळ', 'गौरी शंकरा') इ. सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांनी आपल्या कादबऱ्यातून वास्तवचित्रण केलेले दिसते.

१८८५ ते १९२० हा कालखंड हरिभाऊंच्या प्रभावाचा कालखंड दिसून येतो. ह्या कालखंडात सामाजिक ऐतिहासिक कादंबरीला चालना मिळाली. मुख्यत: पांढरपेशा मध्यमवर्गाच्या सुख-दु:खांचा, स्त्री-समस्या, स्त्री-शिक्षण, स्त्री सुधारणा या विषयीचे चित्रण केलेले दिसते. हरिभाऊंनी कादंबरी वास्तवाभिमुख केलेली दिसते.

१९२० पूर्वीच्या कालखंडातील कादंबऱ्यांचे अवलोकन केले तर मराठी कादंबरीला अद्भुत वातावरणातून बाहेर काढून तिला वास्तवतेकडे आणण्याचे कार्य हरिभाऊंनी केले. १९२० नंतर कांदबरीच्या वैचारिक, कलात्मक आणि प्रचारात्मक वैभवात डॉ. श्री. व्यं. केतकर, वा.म.जोशी, ना.सी. फडके, वि.स. खांडेकर, भा.वि. वरेरकर, विभावरी शिरूरकर, श्री. ना.पेंडसे , गो.नी. दांडेकर, रणजित देसाई, सुमती क्षेत्रमाडे, द.र. कवठेकर, जयवंत दळवी असे कितीतरी कादंबरीकार डोळ्यासमोर येतात. १९२० ते १९४७ हा दोन महायुद्धाच्या दरम्यानच्या काळात, संपूर्ण जगामध्ये खूप उलथापलथी झाल्या. त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम साहित्यावर झाला. या कालखंडातील कादंबरी लेखनावर फडके, खांडेकर, माडखोलकर यांचा प्रभाव होता. १९१९ मध्ये टिळक युग संपले म. गांधीचा काळ सुरू झाला.

डॉ. श्री. व्य. केतकर यांची 'ब्राम्हणकन्या' (१९३०) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीत केतकरांनी अनेक सामाजिक प्रश्नांची चर्चा घडवली आहे. कुमारी माता प्रश्न, जातिभेदाचा प्रश्न, मातृसत्ताक कुटुंबपद्धतीतून निर्माण झालेले प्रश्न मांडले आहेत. 'गोंडवनातील प्रियवंदा', 'गावसासू', 'विचक्षणा', 'भटक्या' या कादंबऱ्यांतून त्यांनी समाजातील पुनरूढ, कानीन, अक्करमाशा संततीचे भवितव्य, पुनर्विवाह, परजातीतील विवाह असे अनेक विषय मांडले आहेत. वा.म. जोशी यांनी 'रागिणी', 'नलिनी', 'इंदू काळे सरला भोळे' इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यातून तत्वचर्चा घडविली आहे. मामा वरेरकरांनी सामाजिक दृष्टीने 'विधवाकुमारी' ही कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीत अल्पवयीन विधवेचे चित्रण केले आहे. तर 'धावता धोटा' यामध्ये मजुरांच्या जगाचे चित्रण केलेले आहे.

ना.सी. फडकेंना 'कलावादी' म्हणून ओळखले जाते. तर खांडेकरांना 'जीवनवादी' मानले जाते. खांडेकरांच्या 'दोन ध्रुव', 'अश्रू', 'आश्रमहरिणी' यासारख्या कादंबऱ्यांमधून सामाजिक चित्रण आले असले तरी ते ही फडकेप्रमाणे रंजनात्मकच लेखन करताना दिसतात. चि. त्र्यं. माडखोलकरांनी 'भंगलेले देऊळ', 'मुक्तात्मा' इ. कादंबऱ्या लिहिल्या आहे. त्यामध्ये क्रांतिकारक, राजकीय वाद प्रवाह, सामाजिक समस्या इ. चे दर्शन घडताना दिसते.

पु. य. देशपांडे यांनी 'बंधनाच्या पलीकडे', 'सुकलेले फूल', 'विशाल जीवन', 'नवे जग'इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीतील नायक वेश्येबरोबर लग्न करताना दाखवले आहे.

१९२० ते १९३५ मधील कांदबरीकारांनी सामाजिक समस्या मांडण्याकडे अधिक लक्ष दिले आहे. मध्यमवर्गीयांचे सुख-दुःख आणि स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा, अन्यायाचा प्रश्न मांडलेला दिसतो. वास्तवतेपेक्षा कल्पनारम्यता अधिक प्रभावी दिसते. या काळातील कादंबरीत व्यक्तिवाद अधिक व वस्तुनिष्ठ समाजदर्शन कमी झालेले दिसून येते.

१९३५ च्या आसपास नवविचारांना चालना मिळाली. विभावरी शिरूरकरांनी 'बळी', 'हिंदोळ्यावर', या कादंबऱ्या लिहिल्या. वि.वि. बोकील यांनी सामाजिक जाणिवेचे चित्रण 'फोल आशा', 'झंझावात', 'ठिगळ'इ. कादंबऱ्यांतून केले आहे. द.र.कवठेकर 'रेशमाच्या गाठी', 'आभाळाची सावली'इ. कादंबरीतून कौटुंबिक चित्रण केले आहे. श्री. के. क्षीरसागर यांनी 'राक्षस विवाह' या कादंबरीतून बाजारी वधूपरीक्षा करणाऱ्या आजच्या लग्नपद्धतीबद्दलचे विचार मांडले आहेत. नागरी वातावरणातून ग्रामीण समाजाचे चित्रण दिघे, कवठेकर, ठोकळ यांनी आपल्या कादंबऱ्यातून केले आहे.

✓ स्वातंत्र्योत्तर काळात समाजात परिवर्तन घडून आले. भाषावार प्रांतरचना झाली. सार्वत्रिक निवडणुका झाल्या, संयुक्त महाराष्ट्राचा लढा झाला, स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. चीनचे आक्रमण, जवाहरलाल नेहरूंचा मृत्यू इ. घटना घडल्या तरी याचा फारसा परिणाम मराठी कादंबरीवर झाला नाही. सामान्यतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची पहिली पाच वर्षे मराठी कादंबरी फडके-खांडेकर-माडखोलकर वळणाचीच राहिली. नंतर तिचे स्वरूप बदलले. १९५० मध्ये विभावरी शिरूरकरांची 'बळी' कादंबरी प्रसिद्ध झाली. बा. भ. बोरकरांनी 'भावीण', रणजित देसाई यांनी बेरड जमातीवर 'बारी' ही कादंबरी लिहिली. श्री.ना. पेंडसे यांनी 'रथचक्र'मध्ये सामान्य स्त्रीचा संघर्ष टिपला. पांढरपेशा मध्यमवर्गीय लोकांच्या सुख-दुःखाभोवती फिरणारी कादंबरी पुढे जाऊन इतर समाजाचे चित्रण करू लागली.

१९६० नंतर ग्रामीण, दलित, स्त्रीवादी इ. साहित्यप्रवाह विकसित झालेले दिसतात. ग्रामीण कांदबरीत ग्रामीण समाजाचे, दलित कादंबरीत दलित समाजाचे चित्रण केलेले दिसते. महानगरीय कादंबरीत नागर समाजाचे चित्रण त्यांचे प्रश्न, त्यांची संस्कृती इ. याचे चित्रण दिसते. त्यामुळे दलित, ग्रामीण, महानगरीय इ. कादंबरीत त्या त्या समाजाचे चित्रण आल्याने त्यादेखील सामाजिक कादंबऱ्याच आहेत.

व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी' या ग्रामीण कादंबरीत धनगरांची वस्ती असलेल्या खेड्याचे चित्रण केले आहे. उद्धव शेळके यांच्या 'धग', 'डाळिंबाचे दाणे', 'बाईविना बुवा'इ. कादंबऱ्यापैकी 'धग' ही महत्वाची कादंबरी आहे. शंकर पाटील ('टारफुला'), रणजित देसाई ('माझा गाव'), 'हमीद दलवाई' ('इंधन'), रा.रं. बोराडे ('पाचोळा'), आनंद यादव ('गोतावळा', 'झोंबी'), रंगनाथ पठारे ('ताम्रपट'), विश्वास पाटील ('चंद्रमुखी', 'झाडाझडती'), महादेव मोरे ('वर आभाळ खाली धरती', 'वस्ती', 'स्टॅण्ड', 'चिताक') इ. अशा अनेक लेखकांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण आपल्या कादंबरीतून केलेले दिसते. पुरूषोत्तम बोरकर ('मेड इन इंडिया'), मोहन पाटील ('बस्तान'), सदानंद देशमुख ('तहान', 'बारोमास'), कृष्णांत खोत ('गावठाण'), शेषराव मोहिते ('असं जगणं तोलाचं) तसेच बाबाराव मुसळे, अशोक व्हटकर, वासुदेव मुलाटे, विजय सिरसट, गणेश आवटे इ. अलीकडच्या काळातील लेखकांनी ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण आपल्या कादंबऱ्यांतून केलेले दिसते.

दलित कादंबरीमध्ये दलित समाजातील जीवनाचे चित्रण केलेले दिसते. अण्णाभाऊ साठेंनी आपल्या 'फकिरा', 'चित्रा', 'वैजयंता', 'माकडीचा माळ'इ. दलित कादंबरीतून दलितांचे दुःख, वेदना पोटतिडकीने मांडल्या आहे. शंकरराव खरात यांनी 'हातभट्टी', 'टिनोपाल गुरुजी', 'पारधी', 'मी माझ्या गावच्या शोधात' इ. कादंबरीतून दलित जीवनाबरोबरच शहरातील झोपड्यांचे गुन्हेगारीचे आणि भटक्या विमुक्तांचे जग चित्रित केले आहे. बाबूराव बागूल यांनी 'कोंडी', 'सुड', 'पावशा' या कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. अलीकडच्या काळात नामदेव कांबळे ('राघववेळ'), उत्तम कांबळे ('श्राद्ध'), नामदेव

ढसाळ ('हाडकी हाडवळा'), अशोक व्हटकर ('मेलेलं पाणी'), बाबा भांड ('दशक्रिया'), राजन गवस ('तणकट'), विजय सिरसट ('कुस्ती', 'कॉलगर्ल'), प्रेमानंद गवळी ('जागर'), ना.म. शिंदे ('जातीला जात वैरी'), निशिकान्त शेंडे ('कलंकमुक्ती') इ. तसेच दि.गो. बनसोडे, अरूण साधू, मुरलीधर जाधव, भाऊ तांबे भीमसेन देढे इ. अनेक लेखकांनी दलित-ग्रामीण समाजाचे चित्रण आपल्या कादंबऱ्यांतून केलेले दिसते.

महानगरीय कादंबरीमध्ये महानगरातील समाजाचे चित्रण केलेले दिसून येते. भाऊ पाध्ये ('वासूकाका', 'वैतागवाडी', 'डोबांऱ्याचा खेळ ') इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. रविंद्र ठाकूर याविषयी लिहितात, ''भाऊ पाध्ये यांच्या कादंबऱ्यांतून समकालीन समाज वास्तवाचं जबर भान प्रकट झालं. त्यांच्या कादंबऱ्यातून महानगरीय समाजाचे विविध स्तर रेखाटले गेले.'' , मनोहर भोळे ('चरसी'), जयवंत दळवी ('चक्र', 'माहिमची खाडी', 'वस्ती वाढते आहे.'), चंद्रकांत खोत ('उभयान्वयी अव्यये'), सुभाष भेंडे ('जोगीण', 'अंधारवाटा'), संजय जोशी ('नचिकेताचे उपाख्यान') ह.मो. मराठे ('निष्पर्ण वृक्षावरी भर दुपारी'), अरूण साधू ('बहिष्कृत', 'शापित') इ. कादंबऱ्यांतून महानगरपालिकेतील राजकारण आणि त्यातील सत्ता-स्पर्धा, पत्रकारिता, कामगार चळवळीचे शोषित, पिडितांचे जग आणि मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण केलेले दिसून येते. महानगरीय कादंबरीतून विविध विषय चित्रित झाले असले तरी मध्यम वर्गीय जीवनाचेच चित्रण अधिक झालेले दिसून येते.

१९४५ च्या सुमारास काही लेखक आदिवासींचे प्रश्न समजावून घेण्यासाठी त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी लेखन करताना दिसतात. ज्यात श.रा. भिसे, श्री. राम अतरदे, प.त्रि. सहस्त्रबुद्धे, वा.ब.कर्णिक यांनी कादंबरी लेखन केले. शं.रा. भिसे, ('जंगलातील छाया'), श्री. राम अतरदे ('सावलीच्या उन्हात'), प.त्रि.सहस्त्रबुद्धे ('पहिली सलामी', 'प्रहार'), वि.वा. हडप, ('अन्नदाता उपाशी', 'गोदाराणी'), वि.म. भुरूकुटे ('दास'), मधुकर वाकोडे ('झेलझपाट', 'सिलीपशेरा'), वा.व.कर्णिक ('वाडगीण') इ. कादंबऱ्यांतून आदिवासी समाजाच्या व्यथा वेदनांचे वास्तवदर्शी असे चित्रण झालेले दिसते. अलीकडच्या काळात बाबा भांड('तंट्या'), नजूबाई गावित ('तृष्णा'), माधव सुरकुंडे ('वाडा') बाबाराव

मडावी ('टाहो'), शंकर नऱ्हे ('उमाजी राजे') या कादंबऱ्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

मुस्लीम समाजाकडे पाहण्याचा मराठी लेखकाचा दृष्टिकोण काहीसा आकसाचा राहिल्याने मुस्लीम समाज चित्रण फारसे आलेले दिसत नाही. राजन खान ('मजार'), ('जातवन'), शकील शेख ('जुबाँ'), फ. मु. शहाजिंदे ('मीतू'), रवींद्र शोभणे ('रक्तध्रुव'), हिदायत खान ('अंधारातील अब्रू'), महमंद नैसर्गी ('आत्मवंचना', 'चक्र गुंतले चक्रात') इ. अनेक कादंबऱ्यांचा निर्देश करता येईल.

१९६० नंतर मराठी कादंबरी ही विविधांगानी विकसित झालेली दिसते. मध्यमवर्गीय जीवनाबरोबरच आदिवासी, भटक्या जमाती, स्त्रियांचे प्रश्न, दलित समाजाचे, ग्रामीण समाजाचे, मुस्लिम समाजाचे वास्तव चित्रण कांदबरीत झालेले दिसते. १९७५ नंतर 'देवदासीचा प्रश्न' राजन गवस यांनी ' भंडारभोग', 'चौंडक'या कादंबऱ्यांतून मांडला आहे. बळवंत कांबळे 'नापत', उत्तम बंडू तुपे 'झुलवा'इ. प्रखर सामाजिक जाणिवेतून लिहिलेल्या आहेत. माधव कोंडविलकर ('आता उजाडेल', 'एक होती कातळवाडी'), शेषराव मोहिते, (धूळ पेरणी), कुमार अनिल (हरवलेल्या वाटा), बाबाराव मुसळे (वारूळ, पाटीलकी), योगीराज वाघमारे, (धुराळ) या काही अलीकडच्या काळातील सामाजिक कादंबऱ्या आहेत.

**स्त्री-लेखिका व सामाजिक कादंबरी**

मराठी भाषेतील कादंबरीलेखन हे इतर भाषांमधील कादंबरी लेखनाच्या तुलनेने बऱ्याच उशीरा सुरू झालेले दिसून येते. यामध्ये पुरूषांप्रमाणे स्त्रियांनीदेखील कादंबरी लेखनास सुरूवात केलेली दिसते. साळूबाई तांबवेकरांनी इ. स. १८७३ मध्ये 'चंद्रप्रभा विरहवर्णन'ही अद्भुरम्य कादंबरी लिहिली आहे.

इ.स. १८८५ ते १९२० या कालखंडातील काशीबाई कानिटकरांच्या 'रंगराव' ही या कादंबरीत तत्कालीन समाजातील अनेक चालीरिती, रूढी, पद्धती, नीती-नियम, स्त्रीविषयक दृष्टिकोन इ. गोष्टींचे चित्रण केलेले आहे. पारतंत्र्याचे दुःखही त्यांनी व्यक्त केलेले आहे. याच कालखंडातील इंदिराबाई हरिपूरकर ('दैवलीला'), दुर्गाबाई जोशी ('सुशीला' अथवा

'एका दुर्दैवी बहिणीची गोष्ट'), गिरीजाबाई केळकर ('पुरी हौस फिटली', 'गोदावरी') जानकीबाई देसाई ('गृहलक्ष्मी', 'प्रेमळ सवत') इ. लेखिकांनी सामाजिक कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत.

इ. स. १८८९ ते १९३० या कालखंडातील 'रंगराव' ही श्रेष्ठ सामाजिक कादंबरी आहे असे दिसते. या कालखंडातील स्त्रियांच्या कादंबऱ्या केवळ स्त्री जीवनातील समस्या मांडताना दिसत नाहीत तर समाजातील जाचक प्रश्नांचाही विचार मांडताना दिसतात.

इ. स. १९२० ते १९३५ या काळात जानकीबाई देसाई ('पत्नीव्रताची कसोटी', 'मूकनायिका'), कमला सोहोनी ('संधीप्रकाश', 'कुठे'), पिरोजबाई आनंदकर ('माझं बाळ ते'), काशीबाई कानिटकर ('पालखीचा गोंडा'), शांताबाई नाशिककर ('लग्नाचा बाजार'), विभावरी शिरूरकर ('हिंदोळ्यावर') तसेच कमलाबाई बंबेवाले, इंदिरा सहस्त्रबुद्धे, इंदिराबाई आंबेगावकर, आनंदीबाई जयवंत इ. लेखिकांनी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. कुमुदिनी प्रभावळकर यांनी 'अनियमित जग', 'निर्माल्यातील कळी' इ. सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'निर्माल्यातील कळी' या कादंबरीत वेश्यांच्या जीवनातील दु:खाचा वेध घेतला आहे.

इ. स. १९२० ते १९३५ हा कादंबरीचा महत्त्वाचा टप्पा आहे असे दिसते. कादंबरीच्या विकास व समृद्धीस लेखिकांनीही फार मोठा हातभार लावलेला दिसून येतो. जुने – नवे प्रश्न, समाजाला धक्का देणारे विचार मांडलेले दिसतात.

इ. स. १९३५ ते १९५० या कालखंडातील गीता साने यांनी आपल्या सामाजिक कादंबरीतून विविध विषय मांडले आहेत. याच काळात प्रेमा कंटक ('काम आणि कामिनी', 'अग्नियान'), कुमुदिनी प्रभावळकर ('एकेरी गाठ', 'कुस्करलेले हृदय'), शांताबाई नाशिककर ('चिखलातले कमळ', 'पुसलेल्या रांगोळ्या') इ. त्याचप्रमाणे मालतीबाई दांडेकर 'मातृमंदिर', 'तेजस्विनी', शांता शेळके, सरोजिनी बाबर, सुधा साठे इ. लेखिकांनी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

इ. स. १९३५ ते १९५० या कालखंडात स्त्रियांच्या कादंबरीचा विचार करत असताना लेखिकांनी प्रामुख्याने सामाजिक कादंबऱ्या अधिक लिहिल्या आहेत असे दिसते. तसेच स्त्री जीवनाच्या विविध अंगांचे, समाजजीवनाचे दर्शन त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांतून घडताना दिसते.

''१९५० पर्यंतच्या स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचा विचार केला तर लक्षात येते की, विभावरी शिरुरकर, गीता साने, इंदिराबाई सहस्त्रबुद्धे या तीन लेखिकांनी स्त्रीला माणूस म्हणून समाजात स्थान असले पाहिजे, असे आग्रहाने मांडले. स्त्रीची दु:खे व तिच्यासमोर उभ्या राहिलेल्या समस्या यांचे भान सर्व लेखिकांना आहे. पण या समस्यांची हाताळणी त्यांना नीट करता आली नाही.''[१] स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लेखिकांनी कादंबरी लेखन मोठ्या प्रमाणावर केले आहे. आधीच्या कादंबरीतून मध्यमवर्गीय खासकरुन ब्राह्मण कुटुंबाची सुख-दु:खे कादंबरीतून चित्रित होत होती. मात्र १९५० मध्ये प्रसिद्ध झालेल्या विभावरी शिरूरकरांच्या 'बळी' या कादंबरीतून मांग-गारुडी समाजाची सुख-दु:खे, त्यांचे पशूपातळीवरील जीवन चित्रित झाले आहे. 'बळी' कादंबरीमुळे एका वेगळ्या जगाची ओळख झाली. ''बळी' ही मराठी कादंबरीला विभावरीबाईंनी दिलेली देणगी आहे.''[२] मराठी लेखिका चिंता आणि चिंतन मध्ये प्रा. द. फडके लिहितात. १९५० नंतर विभावरी शिरुरकरांनी स्त्री जीवनविषयक 'जाई', 'शबरी', 'उमा' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

ज्योत्स्ना देवधर यांनीदेखील 'घरगंगेच्या काठी', 'कल्याणी', 'पडझड' इ. सामाजिक कादंबऱ्यांतून एकत्र कुटुंब पद्धतीचे, स्त्री जीवनाचे, कुटुंबातील संघर्षाचे चित्रण केलेले आहे. त्याचबरोबर अनुराधा वैद्य ('राणीवसा'), निर्मला देशपांडे ('कथा एका वळूची', 'टिकली एवढं तळं'), इंद्रायणी सावकार ('सती'), शैलजा राजे ('संचित'), शकुंतला गोगटे ('सावली'), मालतीबाई दांडेकर ('भिंगरी'), नयना आचार्य ('रानझरी'), डॉ. सुमती क्षेत्रमाडे ('महाश्वेता', 'वृंदा'), कल्याणी हर्डीकर ('पुत्र अमृताचे'), इ. अशा अनेक लेखिकांनी कादंबरी लेखन केले आहे.

१९७५ हे साल आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून साजरे केले गेले. त्यामुळे त्याचे वाङ्मयीन पडसाद १९७५ नंतर अधिक उमटताना दिसतात. बदलत्या स्त्री जीवनाचे जाणीवपूर्वक चित्रण त्यानंतरच्या लेखिकांच्या कादंबऱ्यांतून दिसते. १९७५ ते २००० या काळात लेखन करणाऱ्या गौरी देशपांडे महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांनी 'गोफ' 'कारावासातील पत्रे' इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. शांता गोखले ('रीटा वेलिणकर'), आशा बगे ('आकाश', 'सेतू'), सानिया ('आवर्तन', 'सरकार'), रेखा बेजल ('तृप्ता'), शांता निसळ ('बेघर') तसेच जाई निंबकर, अंबिका सरकार, प्रतिभा रानडे, अंजली सोमण, माधवी देसाई अशा अनेक लेखिकांनी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. सुप्रसिद्ध लेखिका मालतीबाई दांडेकर यांनी स्त्री जीवनातील र्स पातळ्यांवरचे प्रश्न हाताळले. वास्तववादाचे नवे युग सुरू केले. स्त्रीच्या बदलत्या जीवनाचे चित्रण कादंबरीतून होऊ लागलेले दिसते. प्रतिमा इंगोले ('पार्ट टाईम'), माधवी देसाई ('हरवलेल्या वाटा'), आशा बगे ('भूमी'), कविता महाजन ('ब्र', 'भिन्न') या अलीकडच्या काळातील काही सामाजिक कादंबऱ्या आहेत. नीलम माणगावे यांनी 'शोध', 'मृत्यूदंड', 'सोन्या' इ. सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

१९५० ते २००० या कालखंडात लेखिकांनी लिहिलेल्या कौटुंबिक कादंबऱ्यांची संख्या बरीच आहे. कुटुंब, घर, विवाह, स्त्री-पुरुष संबंध, विवाहबाह्य संबंध, दुभंगलेले जीवन, स्त्रीचे पातिव्रत्य, कुटुंबातील मानसिक ताणतणाव, विविध नातेसंबंध इ. अनेक विषयांचे चित्रण केलेले दिसून येते. सामाजिक वास्तवाचे भानही ठेवले आहे असे दिसते.

"लेखिकांना समाजाशी काही देणे-घेणे आहे, समाजाचे ऋण आहे असे वाटत नाही. सर्वसामान्य समाजापासून त्या दूर आहेत. त्यांचे प्रश्न, त्यासाठी आंदोलने फार बेगडी आहेत. ज्या स्त्री स्वातंत्र्याचा या लेखिका आग्रह धरतात त्याचे नेमके रुप त्यांनाही स्पष्ट नाही. फार थोड्या लेखिकांना अत्यंत प्रामाणिकपणे कथावस्तूला सामोरे जाणे शक्य होते. शांता गोखले, गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे इ.मध्ये तो धीटपणा आहे."[११]

एकंदर कौटुंबिक आणि सामाजिक कादंबऱ्यांचा विचार करता, स्त्रियांनी उदंड लेखन केले आहे. काही काही लेखिकांनी झपाट्याने कादंबऱ्या लिहिल्या आहेत. बहुसंख्य लेखिका हौसेपोटी लेखन करताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या कादंबरीत तोच-तोचपणा, रंजनमुल्यांचा प्रभाव दिसतो. अशा प्रकारच्या कादंबऱ्यांची संख्यात्मक वाढ खूप व गुणात्मक वाढ कमी झालेली दिसते.

समारोप

कादंबरीची प्रवृत्तीच मुळात सामाजिक आहे. समाजात जे घडत असते तेच लेखक कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षरितीने आपल्या कादंबरीत मांडत असतो. प्रस्तुत पहिल्या प्रकरणात कादंबरीचा अर्थ, कादंबरीचे प्रकार, सामाजिक कादंबरी अर्थ व विकास याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. बाबा पद्मजींची 'यमुना पर्यटन' ही पहिली सामाजिक कादंबरी प्रकाशित झालेली दिसते. १८८५ ते १९२० हा कालखंड हरिभाऊंच्या प्रभावाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडात सामाजिक कादंबरीला चालना मिळाली असे दिसते. मुख्यतः पांढरपेशा मध्यमवर्गीय समाजाची सुख-दुःखे, स्त्री प्रश्न-समस्या, स्त्री शिक्षण, स्त्री सुधारणा याचे चित्रण अधिक केलेले दिसते. हरिभाऊंनी कादंबरी वास्तवाभिमुख केली.

फडके, खांडेकर, माडखोलकरांच्या काळातील कादंबऱ्यांमध्ये वास्तवतेपेक्षा कल्पनारम्यता अधिक प्रभावी दिसते. स्वातंत्र्योतर काळात मध्यमवर्गीय पांढरपेशा लोकांच्या सुख-दुःखाभोवती फिरणारी कादंबरी वेगळ्या समाजाचे इतर समाजाचे चित्रण करू लागली असे दिसते. १९६० नंतर स्त्रीवादी, दलित, ग्रामीण, आदिवासी इ. साहित्य प्रवाहातून त्या त्या समाजाचे जीवन चित्रण झालेले दिसते.

'रंगराव' ही पहिली स्त्रीलिखित सामाजिक कादंबरी काशीबाई कानिटकरांनी लिहिली. इ. स. १८८५ ते १९२० या काळातील स्त्रियांच्या कादंबऱ्या केवळ स्त्री जीवनातील समस्या मांडताना दिसत नाहीत तर समाजातील जाचक प्रश्नांचाही विचार मांडताना दिसतात. नंतरच्या काळात विभावरी शिरूरकरांनी सामाजिक जाणिवेतून लेखन केलेले दिसते. नंतर

गीता साने, गौरी देशपांडे, ज्योत्स्ना देवधर, कविता महाजन इ.नी सामाजिक कादंबऱ्या लिहिलेल्या दिसतात. एकंदरीत कौटुंबिक व सामाजिक कादंबऱ्याचा विचार करता स्त्रियांनी उदंड लेखन केलेले दिसते. सामाजिक वास्तवाचे भान त्यांना होते पण सामाजिक विषय हाताळताना रंजनात्मकता अधिक दिसते.

शिक्षण प्रसारामुळे खेडेगावातील, तळागाळातील, दलित समाजातील लेखक आपल्या भोवतालच्या परिसरात जे प्रश्न निर्माण होत आहेत, जे प्रश्न त्यांना छळत आहेत ते प्रश्न, समस्या, वेदना त्यांनी कादंबऱ्यांतून व्यक्त केलेल्या दिसतात. गेल्या दीडशे वर्षांत कादंबरीने अनेक चढउतार, यशापयश पचवलेले दिसते. विविध अनुभवांनी ती समृद्ध झालेली दिसते. कधी ती समाज वास्तव प्रभावीपणे मांडताना दिसते. तर कधी रंजूवादी लेखन मोठ्या प्रमाणावर करतना दिसते. तरीदेखील एवढ्या प्रदीर्घ काळानंतर तिच्यावरील मध्यमवर्गीय जाणिवांचा आणि पारंपरिक अभिरूचीचा प्रभाव अधिक दिसतो.

## संदर्भ-सूची


१. जाधव, रा. ग. : मराठी विश्वकोश खंड - ३, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), म. रा. सा. संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ. १९७६, पृ. क्र. ५९९.

२. कुलकर्णी, श्री. मा. : 'कादंबरीची रचना', प्रस्तावना, उन्मेष प्रकाशन, नागपूर, १९७६, पृ. क्र. १३.

३. जोग, रा. श्री., मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सहावा, पृ. क्र. ३३६.

४. कुरूंदकर, नरहर : 'धार आणि काठ', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्र. आ. १९७१, पृ. अ. ३७.

५. प्रा. बापट, प्र. वा. आणि गोडबोले ना. वा. : 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे. पृ. क्र. १६८.

६. वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश (संपा) प्र. भा. गणोरकर, वसंत आबाजी डहाके, जया दडकर, सदानंद भटकळ, आशा राजवाडे, रमेश वरखिडे, ग.रा. भटकळ फाऊंडेशन, पृ. क्र. १८०.

७. प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९४१, पृ. क्र. २१०.

८. कुलकर्णी, वा. ल. : 'हरिभाऊंची सामाजिक कादंबरी', पृ. क्र. १३३.

९. फडके, भा. द. : 'मराठी लेखिका चिंता आणि चिंतन', विद्या प्रकाशन, प्र. आ. १९८०, पृ. क्र. १८६.

१०. तत्रैव, पृ. क्र. १८९.

११. स्त्री साहित्याचा मागोवा, खंड-२, पृ. क्र. १९४.